सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली
सहभागी अंदाजपत्रक नागरिक सुचना अर्ज २०२५-२६

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका ही महाराष्ट्रातील एक पुरोगामी मनपा आहे.म न पा हद्दीत राहणाऱ्या नागरिकांच्या सुविधेसाठी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात नागरिकांनी सुचविलेल्या रास्त कामाचा समावेश करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

नागरिकांना स्थापत्य, विद्युत आणी पाणी पुरवठा लेखाशिर्षा मध्ये खालील कामे सुचविता येतील. (कृपया स्वतंत्र अर्ज करावा.)

कामाचे स्वरूप	सांकेतिक क्रं	कामाचे स्वरूप	सांकेतिक क्रं	कामाचे स्वरूप	सांकेतिक क्रं
पदपथ/सायकल मार्ग	१	माहिती फलक/नामफलक	६	इमारत दुरूस्ती	११
वसस्थानके	२	रस्तयाच्याकडेला झाडे	७	सार्वजनीक वाचनालय	१२
रस्ते दुभाजक किंवा दुरूस्ती	३	वागा/उद्याने/जॉगिंग ट्रॅक	८	पाणी पुरवठा	१३
रस्तयावरील दिवे/पथदीप	४	रस्ता डांवरीकरण	९	मलनि:सारण	१४
वाहतुक नियत्रंण दिवे (सिग्नल)	५	वैठकव्यवस्था	१०	इतर	१५

नागरिकांना लोकारोग्य या लेखाशिर्षा मध्ये खालील कामे सुचविता येतील. (कृपया स्वतंत्र अर्ज करावा.)

कामाचे स्वरूप	सांकेतिक क्रं	कामाचे स्वरूप	सांकेतिक क्रं	कामाचे स्वरूप	सांकेतिक क्रं
स्मशान भुमी	१६	कचराकुंड्या	२०	सरफेस गटर्स	२४
घाट	१७	कचराडेपो	२१	गावठाण गटर्स	२५
आरोग्य निरीक्षक केवीन	१८	कोंडवाडा	२२	नाला ट्रेनिंग	२६
संडास आणी मुताऱ्या	१९	कत्तलखाना	२३	इतर	२७

प्रक्रिया कशी होईल -

१. दि. २४/१२/२०२४ पासून दि. ०५/०१/२०२५ पर्यंत नागरिकांना हा अर्ज भरून कामे सुचवू शकतील.
२. नंतर शक्य कामांची पूर्व-गणनपत्रक (Estimate) तयार केली जातील.
३. त्या नंतर समाविष्ट कामांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल.

अनुषंगिक सूचना :-

१. कृपया एका कामासाठी एकच अर्ज भरावा.एक व्यक्ती आधीक अर्ज भरू शकते.
२. वरील प्रकारची कामे निवडताना प्रस्तावित कामाच्या जागेचा रितसर तावा,खर्च इ. आवश्यक बाबींचा पूर्तता करूनच कामांचा समावेश अंदाजपत्रकात केला जाईल.
३. अंदाजपत्रकातील कोष्टका बाहेरील सूचना ज्याकरीता अंदाजपत्रका मध्ये पैशाची तरतूद करणे आवश्यक नसते,अशा सूचना टाळाव्यात.उदा.कर्मचाऱ्याची नियुक्ती किरकोळ दुरूस्तया,स्वच्छताइ.
४. सदर अर्ज सादर करण्याची दि.०५/०१/२०२५ आहे. अंतिम तारखेनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
५. सदर अर्ज प्रभाग समिती कार्यालया मध्ये उपलब्ध आहेत.
६. नागरिक सूचना अर्ज हे प्रभाग समिती कार्यालया मध्ये सादर करू शकतात,यासाठी केवळ संबधीत (म्हणजे ज्या प्रभाग समिती कार्यालयाच्या अखत्यारीतील काम आहे त्याच) प्रभाग समिती कार्यालयात अर्ज सादर करावा .इतर कोणत्याही प्रभाग समिती कार्यालयात अर्ज सादर करू नये.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली
सहभागी अंदाजपत्रक नागरीक सूचना अर्ज - २०२५-२६

अर्ज भरताना खालील बाबींची विशेष काळजी घ्यावी.

१. सूचना अर्जात कामे सुचविताना मोठी कामे सुचवू नयेत जसे पूल, उड्डाणपुल, नवे रस्ते, भवन बांधकाम इ. केवळ पाच (५) लाखाची मर्यादा लक्षात ठेवावी.

२. सुप्रिमकोर्टा ने अवैध ठरविलेली कामे करण्याबाबतच्या सूचना महानगरपालिकेला स्वीकारता येणार नाहीत.

३. नागरिक सूचना मध्ये कामाचे स्वरूप व स्थान अचूकपणे लिहावे.

४. नागरिक सूचना अर्जातील कोष्टका नुसार कामाचा सांकेतिक क्रमांक नमूद करावा.

प्रभाग समिती कार्यालयाचे नाव (ज्या मध्ये काम सुचविले आहे)	
मतदार वार्ड नांव व नंबर (ज्यामध्ये काम सुचविले आहे)	
नागरिकाचे नाव	
संपर्काचा पत्ता	
मोबाईल क्रमांक (अनिवार्य)	
ई-मेल (असल्यास)	

अ.क्रं	आपल्या परिसरातील मनपा संबधी सुचविलेले काम व ठिकाण	या मुळे साध्य होणारा सार्वजनिक हेतू	कामाचा सांकेतिक क्रमांक
	उदाहरण :- अ) बस स्थानकाजवळ महिलांसाठी शौचालय बांधणे. ब) मनपा ---------- बागे मध्ये मुलांसाठी खेळणी बसविणे.	अ) महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी सोय होईल. ब) मुलांना बागेत खेळण्याचा आनंद मिळेल.	१९ ८

दिनांक :- / /

स्वाक्षरी :-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका अंदाज पत्रक सन २०२५-२०२६
नागरिक सुचना अर्ज पोहच पावती

नागरिकांचे नाव		
	दिनांक	अनुक्रमांक

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

जाहिर निवेदन

सन २०२५-२०२६ च्या अर्थसंल्पामध्ये नागरीकांचा सहभाग

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन २०२४-२०२५ चे सुधारित व सन २०२५-२०२६ चा अर्थसंकल्पामध्ये नागरीकांनी सुचविलेलया सुचनाचा समावेश होणेच्या दृष्टीकोनातुन सर्व प्रभाग समितीमध्ये सन २०२५-२०२६ चा अर्थसंकल्प तयार करताना नागरीकांनी सुचविलेली कामे विचारात घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नागरीकांनी त्याच्या क्षेत्रीय कार्यालयातील / वॉर्डातील कामे सुचविण्याबाबत जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, आपल्या परिसराच्या गरजेनुसार आवश्यक व योग्य कामांचा समावेश अंदाजपत्रकात करण्यासाठी नागरीक सुचना करु शकतील, त्यासाठी विहित नमुन्यातील **"नागरीक सुचना अर्ज"** प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये विनामुल्य वाटपाकरीता उपलब्ध आहेत. तसेच मनपा वेबसाईट www.smkc.gov.in या वर उपलब्ध आहे.

सदर नागरीकांचे सुचना अर्ज दि.०५/०१/२०२५ रोजी सायं.५.०० वाजेपर्यत संबंधित प्रभाग समिती कार्यालयात तसचे खालील ईमेलवर ही स्विकारण्यात येतील.संबंधित सहा.आयुक्त,शहर अभियंता व कार्यकारी अभियंता हे सुचविलेल्या कामांची शहानिशा करुन विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पात करतील याची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी.

१.प्रभाग समिती कार्यालय -१ :- smkcpsno1@gmail.com

२.प्रभाग समिती कार्यालय -२ :- prabhagno2smkc@gmail.com

३.प्रभाग समिती कार्यालय -३ :- smkc.kupwad3@gmail.com

४.प्रभाग समिती कार्यालय -४ :- smkcmiraj4@gmail.com

(शुभम गुप्ता ,भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका